# डॉ. डी. वाय. पाटील कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, तळसंदे

ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

## शेतकरी प्रशिक्षण कार्यशाळा

(**गुरुवार**, **दिनांक** १५ **फेब्रुवारी** २०२४)

जोतीबा मंदीर, जुने पारगाव, ताः हातकनंगले, जि. कोल्हापूर

### विषय : **रताळ्या पासून मूल्यवर्धित पदार्थाची निर्मिती**

---

डॉ. डी वाय पाटील कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, तळसंदे यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना शिबिरा अंतर्गत प्रक्रिया व अन्न अभियांत्रिकी विभागातर्फे रताळ्या पासून मूल्यवर्धित पदार्थाची निर्मिती या विषयावर दिनांक १५ फेब्रुवारी २०२४ रोजी शेतकरी प्रशिक्षण कार्यशाळा ज्योतिबा मंदिर, जुने पारगाव, तालुकाः हातकणंगले , जिल्हाः कोल्हापूर येथे संपन्न झाला. सदर कार्यक्रमास ६० होऊन अधिक प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन जुने पारगावचे सरपंच, श्री. तुकाराम पवार व प्रक्रिया व अन्न अभियांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख प्रा. पी. डी. उके यांच्या हस्ते रोपास पाणी घालून करण्यात आले. सदर कार्यक्रमास जुने पारगावचे ग्रामपंचायत सदस्य, प्रा. एस. एम. पाटील, राष्ट्रीय सेवा योजना, कार्यक्रम समन्वयक, डॉ. वाय. व्ही. शेटे व प्रा. ए. जी. माने हे उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष, प्रा. पी. डी उके यांनी जुने पारगावचे सरपंच, श्री तुकाराम पवार यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. नंतर कार्यक्रमासाठी उपस्थित इतर मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाची प्रस्तावना करताना प्रा. डॉ. वाय. व्ही. शेटे यांनी रताळ्याचे मानवी जीवनात योगदान व महत्त्व याविषयी माहिती सांगून अन्नप्रक्रिया किंवा भाजीपाला प्रक्रिया मार्ग शेतकऱ्यांना कशाप्रकारे आर्थिक विकासामध्ये फायदेशीर होऊ शकतो याविषयी मार्गदर्शन केले.

प्रास्ताविकानंतर, विविध तज्ञांनी त्यांच्या कौशल्य नुसार महिलांना मार्गदर्शन केले. यामध्ये प्रा. पी. डी. उके यांनी "रताळ्या पासून मूल्यवर्धित पदार्थाची निर्मिती" या विषयावर मार्गदर्शन करताना कृषी मालाची होत असणारी नासाडी थांबविणे गरजेचे असून त्यासाठी मूल्यवर्धित पदार्थाची निर्मिती हा एकमेव मार्ग असल्याचे सांगितले. ज्या त्या हंगामात येणारा भाजीपाला, त्याच हंगामात आहारात दिसतो, इतर हंगामात मिळत नाही, शिवाय नाशवंत असल्याने जास्त दिवस टिकतही नाही, त्यासाठी वेगवेगळ्या मूल्यवर्धित पदार्थाची निर्मिती हा

एकमेव उत्तम पर्याय आहे. बाजारभाव कमी असताना त्यासाठी वेगवेगळ्या मूल्यवर्धित पदार्थांची निर्मिती करून आर्थिक नुकसान न होता शेतकऱ्यांना त्यापासून जास्त पैसे मिळतील असे सांगितले.

प्रा. ए. जी माने यांनी पॅकेजिंग व विक्री व्यवस्था यावर मार्गदर्शन केले व सरकारतर्फे महिलांना प्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी मिळत असलेले अनुदान व महिलांचा अन्नप्रक्रिया उद्योग कशा प्रकारे यशस्वी करू शकतात याबद्दल सांगितले.

विविध तज्ञांनी मार्गदर्शन केले नंतर पुढील सत्रात रताळ्या पासून विविध पदार्थ तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले व महिलांना स्वतः प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करण्यास सांगितले

कार्यक्रमाचा शेवट सर्व उपस्थित महिला शेतकरी यांच्यासोबत समूह छायाचित्र घेऊन करण्यात आला कार्यक्रमाचे अभिप्राय देताना महिलांनी कार्यक्रम खूप छान झाला व पुढेही अशा प्रकारचे कार्यक्रम व्हावे ही भावना प्रशिक्षणार्थी यांनी व्यक्त केली.

डी. वाय. पाटील ग्रुप नेहमीच शेतकरी व महिला यांच्यासाठी अश्या प्रकारची मार्गदर्शन मेळावे व प्रशिक्षण आयोजित करत असते.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. बी. पाटील, डी. वाय. पाटील ग्रुप, कोल्हापूर चे हेड़ फार्म ऑपरेशन, इंजि. ए. बी. गाताडे यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष, मा. डॉ. संजय डी. पाटील, विश्वस्त मा. आमदार श्री. ऋतुराज संजय पाटील, डी. वाय. पाटील ग्रुप चे कार्यकारी संचालक, डॉ. ए. के. गुप्ता यांचे प्रोत्साहन लाभले.

या मेळावा व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन नियोजन महाविद्यालयाचे प्रा. पी. डी उके, प्रा. डॉ. वाय. व्ही. शेटे व प्रा. ए. जी. माने प्रक्रिया व अन्न अभियांत्रिकी विभाग व प्रा. एस. एम. पाटील, राष्ट्रीय सेवा योजना, कार्यक्रम समन्वयक, डॉ. डी. वाय पाटील कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय तळसंदे यांनी केले.









**रताळ्या पासून मूल्यवर्धित पदार्थांची निर्मिती**

शेतकरी प्रशिक्षण कार्यशाळा जोतीबा मंदीर, जुने पारगाव, ता॰ हातकनंगले, जि - कोल्हापूर







**रताळ्या पासून मूल्यवर्धित पदार्थाची निर्मिती**

शेतकरी प्रशिक्षण कार्यशाळा जोतीबा मंदीर, जुने पारगाव, ताः हातकनंगले, जि - कोल्हापूर






**रताळ्या पासून मूल्यवर्धित पदार्थाची निर्मिती**

शेतकरी प्रशिक्षण कार्यशाळा जोतीबा मंदीर, जुने पारगाव, ताः हातकनंगले, जि - कोल्हापूर






**रताळ्या पासून मूल्यवर्धित पदार्थांची निर्मिती**

शेतकरी प्रशिक्षण कार्यशाळा जोतीबा मंदीर, जुने पारगाव, ता: हातकनंगले, जि. कोल्हापूर





प्रात्यक्षिक करताना शेतकरी

शेतकरी प्रशिक्षण कार्यशाळा, ज्योतिबा मंदिर, जुने पारगाव